**आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी पात्र विद्यार्थ्यांच्या हिश्श्याची शिक्षण शुल्काची ५० टक्के रक्कम शिक्षण संस्थांनी न घेण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन परिपत्रक, क्रमांक :- संकीर्ण (बैठक) १५१८/प्र.क्र. ५०/७ अे**
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई .४०००३२
दिनांक : १० एप्रिल, २०१८

**वाचा :-** शासन परिपत्रक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक ईबीसी २०१८/प्र.क्र.३८/तांशि-४, दिनांक १४.०२.२०१८

**परिपत्रक :**

कृषी विभागांतर्गत राज्यातील सर्व कृषी विद्यापीठे यांच्या अखत्यारितील विविध मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांना केंद्रीभूत प्रवेश पध्दतीने / विहित पध्दतीने प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत ५० टक्के शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती शासनाकडून करण्यात येते. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून सदर ५० टक्के शिक्षण शुल्काची प्रतिपूर्तीची रक्कम पात्र विद्यार्थ्यांना बँक खात्यात थेट जमा करण्यात येणार आहे.

२. राज्यातील बऱ्याचशा शिक्षण संस्था आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना प्रवेश देताना प्रवेशाच्यावेळी १०० टक्के शिक्षण शुल्क भरण्याचा आग्रह धरतात. किंबहूना, १०० टक्के शिक्षण शुल्क भरल्याशिवाय विद्यार्थ्यांना प्रवेश देत नाहीत, अशा तक्रारी विद्यार्थ्यांकडून, पालकांकडून, विविध संघटनांकडून तसेच लोकप्रतिनिधींकडून शासनाकडे वारंवार प्राप्त होत असतात. वास्तविक प्रवेशाच्यावेळी अशा विद्यार्थ्यांकडून फक्त त्यांच्या हिश्श्याची ५० टक्के रक्कम शिक्षण संस्थांनी घेणे अपेक्षित आहे. उर्वरित ५० टक्के रक्कम शासनाकडून शिष्यवृत्तीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात येणार आहे व तद्नंतर विद्यार्थ्यांनी ती शिक्षण संस्थांमध्ये भरणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने याद्वारे सूचित करण्यात येते की, सर्व संबंधित शिक्षण संस्थांनी आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना प्रवेश देताना पात्र विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्काची १०० टक्के रक्कम अथवा पूर्ण रक्कम विद्यार्थ्यांनी भरावी, असा आग्रह धरु नये. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील ज्या विद्यार्थ्यांना १०० टक्के शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती अनुज्ञेय आहे, त्या पात्र विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्काची रक्कम भरण्याचा आग्रह करण्यात येऊ नये. तसेच, ज्या विद्यार्थ्यांना ५० टक्के शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती अनुज्ञेय आहे, त्या पात्र विद्यार्थ्यांनी प्रवेश घेताना ५० टक्के शिक्षण शुल्क भरल्यास त्यांना प्रवेश देणे क्रमप्राप्त आहे. अशा पध्दतीने शिक्षण संस्थांनी आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्काची संपूर्ण रक्कम भरावी असा आग्रह धरल्यास किंवा मागणी केल्यास अशा संस्थांविरुध्द कारवाई करण्यात येईल, अशा सक्त सूचना याद्वारे देण्यात येत आहेत. ही बाब राज्यातील सर्व कृषी विद्यापीठे यांनी त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व शिक्षण संस्थांच्या कटाक्षाने निदर्शनास आणावी. याउपर अशा प्रकारची तक्रार प्राप्त झाल्यास संबंधित संस्थांना समज द्यावी व आवश्यकता वाटल्यास संस्थांविरुध्द कारवाई करावी.

३. सदर परिपत्रकास सर्व प्रसिध्दी माध्यमांद्वारे संबंधित विद्यापीठांनी प्रसिध्दी द्यावी. तसेच विद्यापीठाच्या संकेत स्थळांवर हे परिपत्रक जाहीर करावे.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०४१११५३८०१२४०१ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Devappa Annappa Gavade

Digitally signed by Devappa Annappa Gavade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=eb6891ac4984581cb912dab1f553c065a5dd35da6c8e7cf4f22d8f94fa5f56d7, serialNumber=d00367c67d2ea5a7aecea40a3081cba4d043b40cc7b0ef510250b3ea4f9795d6, cn=Devappa Annappa Gavade
Date: 2018.04.11 15:41:01 +05'30'

**( दे. आ. गावडे )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मंत्री (कृषी) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
२. मा.मंत्री (महसूल) तथा अध्यक्ष, मंत्रीमंडळ उप समिती (मराठा मोर्चा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.राज्यमंत्री (कृषी) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
४. मा.अपर मुख्य सचिव (कृषी) यांचे स्वीय सहाय्यक, कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
५. सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे
६. कुलगुरु/कुलसचिव/नियंत्रक, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी
७. कुलगुरु/कुलसचिव/नियंत्रक, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर
८. कुलगुरु/कुलसचिव/नियंत्रक, डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला,
९. कुलगुरु/कुलसचिव/नियंत्रक, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी
१०. संचालक (शिक्षण), महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे
११. सह सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. सह सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. कक्ष अधिकारी (६ अे/ २ अे), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
१४. निवड नस्ती का- ७ अे कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई ३२